**ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम, २००० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकरणाची नियुक्ती करण्याबाबत.**

## महाराष्ट्र शासन
## पर्यावरण विभाग

**शासन निर्णय क्रमांक : याचिका-२०१५/प्र.क्र. ०६/तां.क.१**

१५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई.

दिनांक: २८/०७/२०१५

---

**वाचा :-** १) शासन निर्णय क्र.ध्वनीप्र-२०००/प्र.क्र.२४/तां.क.३, दि.१६/०८/२००० आणि दि.१५/०६/२००१.

२) मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठामध्ये दाखल करण्यात आलेल्या सार्वजनिक हिताच्या याचिका क्र.(१) २०५३/२००३, (२) ७४/२००७, (३) ८५/२००७ आणि (४) १/२००९ मधील दिनांक २६/०२/२००९ चे आदेश

३) शासन निर्णय क्र.ध्वनीप्र-२००९/प्र.क्र.९५/तां.क.१, दि.२१/०४/२००९.

४) मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठामध्ये दाखल याचिका क्र.१७३/२०१० डॉ.महेश बेडेकर वि.महाराष्ट्र शासन संदर्भात मा.उच्च न्यायालयाचे दि.१३/०३/२०१५ चे आदेश.

**प्रस्तावना :-**

पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.एनपी/२०००/२४, दि.१६/०८/२००० व शा.नि.क्र.ध्वनीप्र-२००९/प्र.क्र.९५/तां.क.१ दि.२१/०४/२००९ अन्वये ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम-२००० च्या कलम २ (क) नुसार राज्यातील पोलीस आयुक्त असलेल्या शहरांमध्ये पोलीस आयुक्त किंवा उप पोलीस आयुक्त या दर्जाचा अधिकारी व इतर ठिकाणी जिल्हा पोलीस अधिक्षक किंवा उप जिल्हा पोलीस अधिक्षक यांची ध्वनी प्रदूषण नियम-२००० ची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.१७३/२०१० मधील दि.१३/०३/२०१५ च्या आदेशान्वये राज्यात ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम-२००० ची कडक अंमलबजावणी करण्याकरिता दिलेले आदेश विचारात घेता, उपरोक्त शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे सूधारणा करणे विचाराधीन होते.

**शासन निर्णय :-**

ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम-२००० च्या २(क) नुसार आता राज्यातील पोलीस आयुक्त असलेल्या शहरांमध्ये पोलीस आयुक्त किंवा पोलीस उप आयुक्त किंवा सहायक पोलीस आयुक्त आणि इतर क्षेत्रामध्ये संबंधीत पोलीस अधिक्षक किंवा पोलीस उप अधिक्षक दर्जाचा अधिकारी यांची ध्वनी प्रदूषण नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी ध्वनी प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. हे ध्वनी प्राधिकारी या नियमांच्या सुलभ अंमलबजावणीसाठी त्यांच्या कार्यक्षेत्रात विभागनिहाय/ वार्डनिहाय ध्वनी प्रदूषण अधिकारी प्राधिकृत करुन संयंत्रणा विकसित करतील.

नियुक्त ध्वनी प्राधिकारी व त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांचे पत्ते, पदनाम, दूरध्वनी क्रमांक, इमेल इत्यादि माहितीस नागरिकांच्या माहितीसाठी विभागनिहाय/ वार्डनिहाय मोक्याच्या ठिकाणी फलक लावावेत, स्थानिक वर्तमानपत्र व केबल नेटवर्कद्वारे वेळोवेळी प्रसिद्धी द्यावी आणि ही माहिती

संकेतस्थळावरसुद्धा उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच, ध्वनी प्रदूषणासंबंधीत तक्रार प्राप्त करुन घेण्यासाठी १०० क्रमांकाच्या दूरध्वनी सेवेमध्ये या बाबीचा समावेश करुन ती कार्यान्वित करण्यात यावी. सदरहू शासन निर्णय गृह विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे. याव्यतिरिक्त मूळ शासन निर्णयामध्ये कोणताही बदल नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक ----------------------असा आहे.
201507291207261304

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

28/7/15

(मालिनी शंकर)
अपर मुख्य सचिव

प्रत माहितीसाठी :-

१) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
२) मा.मुख्य सचिव
३) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय
४) प्रधान सचिव (अपिले व सुरक्षा), गृह विभाग
५) प्रधान सचिव, नगर विकास विभाग (१), मंत्रालय
६) प्रधान सचिव, नगर विकास विभाग (२), मंत्रालय
७) प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय
८) सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय
९) मा.मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव
१०) मा.राज्यमंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव
११) सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
१२) सर्व जिल्हाधिकारी
१३) सर्व पोलीस आयुक्त/ उप आयुक्त/ सह पोलीस आयुक्त
१४) सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक/ उप अधिक्षक
१५) सर्व अधिकारी/ कार्यासने/ निवडनस्ती-तां.क.१, पर्यावरण विभाग, मंत्रालय.